
# ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’ संचलित ‘बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा’च्या वतीने वेबिनार

■ स्टेजवरच्या पारंपरिक ‘सेमिनार’ला ‘वेबिनार’चा आधुनिक पर्याय

■ मान्यवरांच्या ‘ऑनलाईन’ उपस्थितीत मधमाश्यांची कार्यशैली झाली ‘अनलॉक’




**‘कोरोना’**च्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन असताना मधमाशी पालन करणाऱ्यांना; तसेच मधमाशी पालक होऊ इच्छिणाऱ्यांना मधमाशीबद्दलची माहिती देण्यासाठी ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’ संचलित ‘बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा’च्या वतीने सातत्याने अनेक उपक्रम राबविण्यात येत असतात.

२० मे हा दिवस ‘जागतिक मधमाशी दिन’ म्हणून साजरा केला जातो. खरं तर यावर्षी बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राच्या वतीने दि. २० मे २०२० या दिवशी मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रस्तावित होते. परंतु ‘कोरोना’च्या पार्श्वभूमीवर नियोजित कार्यक्रम रद्द करावे लागले. पण इतर माध्यमातून का होईना ‘जागतिक मधमाशी दिन’ साजरा करण्याचे निश्चित असल्यामुळे ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’च्या वतीने पहिल्यांदाच वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

या वेबिनारसाठी **डॉ.श्री. तुकाराम निकम, डॉ.श्री. धनंजय वाखले, डॉ.श्री. गोपाल पालिवाल, ‘ॲग्रोवन’चे श्री. मंदार मुंडले आणि डॉ.श्री. डी.आर. पाटील** या विषयतज्ज्ञांना निमंत्रित करण्यात आले होते.

वेबिनारच्या प्रारंभी ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’चे टेक्निकल डायरेक्टर तथा ‘पूर्वा कृषिदूत’ मासिकाचे संपादक **डॉ.श्री. भास्कर गायकवाड** यांनी मधमाशी पालनाची सद्यस्थिती आणि भविष्याबद्दल मनोगत व्यक्त केले. पुणेस्थित केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचे माजी प्रमुख तथा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.श्री. धनंजय वाखले यांनी मध उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता तपासणी, विक्री व्यवस्था या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

आग्या मोहळाविषयी जागतिक पातळीवर संवर्धन-संशोधनाचे कार्य करणारे वर्धास्थित डॉ. गोपाल पालिवाल यांनी आग्या मोहळाचे संवर्धन, मध उत्पादन आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती यावर आपले अनुभव कथन करून आग्या मोहळाविषयी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली.

**‘पूर्वा केमटेक’** तसेच **‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’**चे कार्यकारी संचालक **श्री. संजय पवार** यांनी मधमाशी पालनातून रोजगार निर्मितीच्या संधी तसेच परागीभवनातून वाढत्या कृषी उत्पादनाद्वारे शेतीचा होणारा फायदा याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यासाठी बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राच्या वतीने विविध उपक्रम राबविणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाबळेश्वर येथील खादी ग्रामोद्योग विभागाचे संचालक डॉ. डी.आर. पाटील यांनी मधमाशी पालन या विषयावर महाराष्ट्रामध्ये सुरू असलेल्या विविध योजना तसेच उपक्रमांची माहिती दिली. या वेबिनारमध्ये १८५ जणांनी नावनोंदणी केली होती. यावेळी अनेकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांनी सविस्तर उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन ‘पूर्वा केमटेक’च्या मानव संसाधन विभागाचे श्री. रुपेश ठाकरे यांनी केले. ■